## Arts & Commerce College, Warwat Bakal
## Tq. Sangrampur Dist. Buldana

### Research Papers 2023-2024

| Sr. No | Title of Paper | Name of Author | Department | Journal | Year | Impact Factor |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Interrelationship of employment, income and consumption | S. R. Bhaltadak | Commerce | The Rubrics journal of Interdisciplinary studies | March-2024 | |
| 2 | Savings and Investment Correlation Approach | S. R. Bhaltadak | Commerce | International journal of cultural studies and social sciences | April-2024 | |

ISSN 2454-1974

# THE RUBRICS

Journal of Interdisciplinary Studies

*International, Peer Reviewed, Indexed*

www.therubrics.in

One Day Multidisciplinary International Conference On

## Global Perspectives in Higher Education: Issues, Challenges and Remedies

9th March 2024

GPIHE

*Conference Proceeding: Special Issue Editors*

**Dr. Manoj Bhagat, Dr. Pravin Chandak**
**Dr. Sau. Aparna Patil, Dr. Sunil Chakave**
**Dr. Deepak Kute**

*Organized by*

Bapuraoji Butle Arts, Narayanrao Bhat Commerce and Bapusaheb Patil Science College, Digras, Dist. Yavatmal

M. M. Mahavidyalaya Darwha, Dist. Yavatmal

Arts and Commerce College, Bori Arab, Dist. Yavatmal

*Published by*

Magnus Publishing & Distributors

One Day Multidisciplinary International Conference On

# Global Perspectives in Higher Education: Issues, Challenges and Remedies

9th March 2024

*Conference Proceeding*

*Special Issue Editors*

**Dr. Manoj Bhagat, Dr. Pravin Chandak**
**Dr. Sau. Aparna Patil, Dr. Sunil Chakave**
**Dr. Deepak Kute**

*Organized by*

Principal

Bapuraoji Butle Arts, Narayanrao Bhat Commerce and Bapusaheb Patil Science College, Digras, Dist. Yavatmal

Mungasaji Maharaj Mahavidyalaya Darwha, Dist. Yavatmal

Arts and Commerce College, Bori Arab, Dist. Yavatmal

*Published by*

Magnus Publishing & Distributors

SANT GADGE BABA AMRAVATI UNIVERSITY, AMRAVATI

**Bapuraoji Butle Arts, Narayanrao Bhat Commerce and Bapusaheb Patil Science College, Digras Dist. Yavatmal, Maharashtra (India)**

NAAC REACCREDITED 'A' (CGPA 3.16)

**In collaboration with**

**Mungasaji Maharaj Mahavidyalaya, Darwha and Arts & Commerce College, Bori Arab**

Organizing

# ONE DAY MULTIDISCIPLINARY INTERNATIONAL CONFERENCE

## Certificate

This is to Certify that Dr./Prof./Mr./Mrs./Ms. Suresh Ramesh Bhaltadak. of Arts & Commerce College, Warwat Bakal Dist. Buldana. has participated in the One Day Multidisciplinary International Conference on "Global Perspectives in Higher Education : Issues, Challenges And Remedies" on 9th March 2024. He / She has participated as a Resource Person / Chairperson / Jury / Delegate / Research Scholar. He / She has worked as a / presented / Published a paper entitled "Rojgar, Utpanna wa upabhog yancha paraspar sambandh."

| | | | |
|---|---|---|---|
| **DR. A.R. LADOLE** | **DR. V.B. RAUT** | **DR. D.K. KHUPSE** | **DR. M.N. BHAGAT** |
| Principal | Principal | Principal | Organizing Secretary |
| Bapuraoji Butle Arts, Narayanrao Bhat Commerce and Bapusaheb Patil Science College, Digras | Mungasaji Maharaj Mahavidyalaya, Darwha | Arts & Commerce College, Bori Arab | GPIHE |

ISSN 2454-1974

# रोजगार, उत्पन्न व उपभोग यांचा परस्पर संबंध

**डॉ. सुरेश आर. भालतडक**

संशोधक, सहाय्यक प्राध्यापक,
कला वाणिज्य महाविद्यालय वरवट बकाल ता. संग्रामपूर, जिल्हा-बुलढाणा.

**प्रस्तावना**

आपले चरितार्थ चालवण्यासाठी प्रत्येक व्यक्ती काही ना काही काम करीत असते परंतु या कामामुळे देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नात भर पडते तेच कार्य उत्पादकीय कार्य समाजल्या जाते. ''उदरनिर्वाह करण्यासाठी व्यक्तीकडून लभार्जन प्राप्तीसाठी जो कोणता कामधंदा व्यवसाय केला जातो त्याला रोजगार म्हणतात.'' म्हणजेच प्रत्येक व्यक्ती करीत असलेले कार्य व राष्ट्रीय उत्पन्न यांच्या जवळच्या संबंध आहे. देशातील संख्येने मोठी लोकसंख्या ज्या क्षेत्रात कार्य करते त्या क्षेत्रात रोजगार व उत्पन्न जास्त राहते. भारतासारख्या विकसनशील देशात ६० टक्के च्या जवळपास लोकसंख्या प्राथमिक क्षेत्रात काम करतात त्यामुळे रोजगार, राष्ट्रीय उत्पन्नामध्ये या क्षेत्राची महत्वाची भूमिका आहे. म्हणजे असे म्हणता येईल की रोजगार प्रमाण, रोजगाराचे क्षेत्र व उत्पन्न यांच्या घनिष्ठ संबंध आहे. भारतामध्ये ६० टक्के लोकसंख्या प्राथमिक क्षेत्रात कार्य करते तरीही राष्ट्रीय उत्पन्नात प्राथमिक क्षेत्राचा वाटा १७ टक्के आहे. रोजगारीचे प्रमाण जास्त असल्यास उत्पन्न पातळी जास्त राहते तर रोजगारीचे प्रमाण कमी असल्यास उत्पन्न पातळी कमी राहते.

**रोजगार आणि उत्पन्न पातळी निश्चित करणारे घटक**

देशामध्ये रोजगार आणि उत्पन्न पातळी विविध घटकावर अवलंबून असते. सर्वसामान्यपणे कोणत्याही देशासाठी पुढील घटक रोजगार व उत्पन्न पातळी निश्चित करतात.

१) संयोजकाची मनोवृत्ती २) उपभोग प्रवृत्ती

३) लोकसंख्या व लोकसंख्येची रचना ४) लोकांची मनोवृत्ती

५) सरकारी धोरणे ६) भांडवलाची उपलब्धता

अभिमतपंथी अर्थतज्ञ जे. बी. से च्या मते ''प्रत्येक पुरवठा हा आपली मागणी निर्माण करतोश् म्हणजेच देशाच्या अर्थव्यवस्थेत जेवढे वस्तू व सेवांचे उत्पादन होते तेवढे मागणी निर्माण होते. लोकांचे उत्पन्न हे मागणी निर्माण करण्यापुरते असते. प्रो. केन्सच्या मते अर्थव्यवस्थेमध्ये रोजगार व उत्पन्नाचे प्रमाण भांडवलाची सीमांत लाभ क्षमता हे प्रभावी मागणीवर अवलंबून असते. कोणत्याही देशातील लोकांची अर्थरचना हे त्यांच्या उत्पन्न व रोजगार पातळीवर अवलंबून असते. लॉर्ड केन्स यांनी १९३६ मध्ये लिहिलेल्या " General Theory of Employment Intrest & Money" या ग्रंथात असे विवेचन केले की देशातील लोकांचे रोजगार पातळी ही प्रभावी मागणीवर अवलंबून असते. देशातील प्रभावी मागणी ही उपभोग खर्चावर व गुंतवणूक खर्चावर अवलंबून असते. देशाचे उत्पन्न, उत्पादन, रोजगार हे तीनही घटक परस्परावर अवलंबून असून त्या एकाच वेळी निश्चित होतात. त्याचप्रमाणे उत्पन्न, उत्पादन व रोजगार हे समदिशेने बदलणारे घटक आहे. देशातील रोजगाराची पातळी ही समाजाच्या एकूण प्रभावी मागणीवर अवलंबून आहे.

देशातील प्रभावी मागणी वाढल्यास रोजगार क्षमतेत वाढ होते आणि प्रभावी मागणी घटल्यास देशातील रोजगार क्षमतेत घट होते. प्रभावी मागणी ही समाजातील लोकांच्या एकूण उपभोग खर्चावर व गुंतवणूक खर्चावर अवलंबून असते. प्रभावी मागणीसाठी लोकांकडे वस्तू खरेदी करण्याची इच्छा, खर्च करण्याची ऐपत याची आवश्यकता असायला पाहिजे. कोणत्याही प्रकारची मागणी ही प्रभावी मागणी होत नाही. प्रभावी मागणीसाठी विविध किंमतीवर वस्तू खरेदी करण्याची ग्राहकांची इच्छा आणि क्षमता असणे आवश्यक आहे. एकूण मागणी ही एकूण पुरवठा बरोबर असते तीच प्रभावी मागणी असते. प्रभावी मागणी जेव्हा पुरेशी नसते तेव्हा रोजगार कमी होऊन बेकारी वाढते सर्वसामान्यपणे असे लक्षात येते की लोकांचे एकूण उत्पन्न वाढले असता एकूण उपभोग सुद्धा वाढतो परंतु वाढलेल्या उत्पन्नाच्या प्रमाणात उपभोगाचे प्रमाण वाढत नाही हे सर्व प्रभावी मागणीच्या अभावामुळे निर्माण होते म्हणून अर्थव्यवस्थेमध्ये जर रोजगार निर्माण करायचा असेल

ISSN 2454-1974

तर गुंतवणुकीत वाढ होऊन प्रभावी मागणीत वाढ करणे आवश्यक आहे. समाजाच्या उपभोग प्रवृत्तीत वाढ झाल्यास वस्तू व सेवांच्या मागणीत वाढ होऊन भांडवली सीमांत लाभ क्षमता वाढते. त्यामुळे भांडवली वस्तूच्या मागणीत वाढ होते याच्या उलट जर समाजाच्या उपभोग प्रवृत्तीत घट झाल्यास वस्तू व सेवांच्या मागणीत घट होते. त्यामुळे भांडवलाच्या सीमांत लाभ क्षमतेवर प्रतिकूल परिणाम होऊन गुंतवणूक कमी होते.

**उपभोग प्रवृत्तीचा प्रवाह**

अभिमतपंथी अर्थतज्ञ सामान्यता उपभोग हा आर्थिक क्रियाकल्पांचा अंतिम उद्देश मानतात. प्रतिव्यक्ती वापराच्या पातळीला अर्थव्यवस्थेत उत्पादक यशाचा मध्यवर्ती उपाय समजला जातो. देशामध्ये रोजगाराची पातळी टिकविण्यासाठी ती पातळी असताना लोकांना एकंदर जेवढे उत्पन्न मिळते त्या उत्पन्नातून जेवढी बचत केली जाईल, तेवढीच भांडवल गुंतवणुक होत असल्यास रोजगाराची ती पातळी टिकविणे शक्य होते. कारण एकंदर उत्पादन मूल्य म्हणजे एकंदर उत्पन्न जेवढे असेल तेवढाच बरोबर उत्पादनावर एकंदर खर्च होतो. हा नियम पूर्ण रोजगारासही लागू आहे. पण या संदर्भात एक गोष्ट कटाक्षाने लक्षात ठेवणे अगत्याचे आहे की, रोजगार जेवढा अधिक, तेवढे उत्पन्न अधिक. साहजिकच घटत्या उपभोग प्रवृत्तीनुसार रोजगार जेवढा अधिक, तेवढी बचत अधिक होते. म्हणजेच अधिक रोजगार टिकविण्यासाठी गुंतवणुक अधिक असावी लागते.

अर्थव्यवस्थेत लोकांचा एकूण उपभोगच बचत ठरवीत असते कारण बचत म्हणजेच उपभोग न केलेला उत्पन्नाचा भाग असतो. बचतच भांडवलाचा राष्ट्रीय पुरवठा तयार करण्यासाठी महत्त्वाचा घटक असतो.मुख्य प्रवाहातील अर्थशास्त्रज्ञांच्या मते वस्तू आणि सेवांचा ग्राहकांनी घेतलेला अंतिम सेवनच उपभोग बनते. तर इतर प्रकारचे खर्च विशेषतः ही निश्चित गुंतवणुक, मध्यवर्ती वापर आणि सरकारी खर्च बनतो. प्रो.केन्सच्या मते उपभोगाच्या निर्णयावर विविध घटक प्रभाव टाकतात परंतु अल्पावधीत सर्वात महत्त्वाचा घटक म्हणजे वास्तविक उत्पन्न होय. परिपूर्ण उत्पन्नाच्या गृहीतक अनुसार उपभोगाच्या वस्तू आणि सेवावर उपभोक्ता यांचा खर्च त्याच्या सध्याच्या निव्वळ उत्पन्नाचे एक रेषीय कार्य आहे.

**उपभोगाचे प्रकार**

जेम्स ड्युसेनबेरी यांनी मांडलेल्या उत्पन्न सापेक्ष मॉडेल मध्ये व्यक्तीची सामाजिक तुलना करता दोन समान पदावरील व्यक्ती चा उपभोग वेगवेगळा असतो. व्यक्तीचे उत्पन्न कमी झाले तरी तो पूर्वीच्या उपभोग पातळीला चिकटलेला असतो त्यामुळे उपभोग कमी करण्यास तो तयार होत नाही. व्यक्तीने घेतलेल्या उपभोगाच्या उद्देशा नुसार सर्वसामान्यपणे उपभोगाची खालील वेगवेगळे प्रकार पडतात.

१) अंतिम उपभोग २) उत्पादक उपभोग

३) मंद उपभोग ४) जलद उपभोग

५) अपव्यय उपभोग ६) सुस्पष्ट उपभोग

७) प्रतीकात्मक उपभोग ८) व्यसनाधीन उपभोग

९) प्रत्यक्ष उपभोग १०) अप्रत्यक्ष उपभोग व्यक्ती उपभोगाचे निर्णय घेत असताना त्याच्या गरजा, मानसिकता, दृष्टिकोण त्याला प्रभावित करतात.

**उपभोग प्रवृत्ती प्रकार**

रोजगारामुळे लोकांच्या उत्पन्नामध्ये वाढ होते. वाढीव उत्पन्नामुळे लोकांच्या उपभोग खर्चात वाढ होते. पण वाढलेल्या उत्पन्नाच्या प्रमाणात उपभोग खर्चात वाढ होत नाही. कारण लोकांच्या प्राथमिक गरजा पूर्ण झाल्यामुळे पुन्हा त्यांना वारंवार खर्च करावा लागणार नाही. रोजगाराची पातळी निर्धारित करणारा प्रभावी मागणी हा एक मुख्य घटक आहे. प्रभावी मागणी निर्धारित करणारे घटकामध्ये उपभोग खर्च आणि गुंतवणूक खर्च यांचा समावेश होतो.

उपभोग आणि उपभोग प्रवृत्ती ह्या मध्ये फरक आहे. एका विशिष्ट काळात उत्पन्नातील जेवढा भाग उपभोग्य वस्तूवर खर्च करतात त्याला उपभोग किंवा उपभोग खर्च असे म्हणतात. तर "एकूण उपभोग खर्चाचे एकूण उत्पन्नाशी असलेले प्रमाण म्हणजे उपभोग प्रवृत्ती होय." प्राप्तीच्या व उपभोगाच्या संबंधाला उपभोग कार्य असे म्हणतात.

ISSN 2454-1974

उपभोग प्रवृत्ती = एकूण उपभोग खर्च ÷ एकूण उत्पन्न ¼ C÷Y ½

यामध्ये, C¾ Consumption & Y= Income

C ¾ f ¼y½ ¼ Consumption is the function of income ½

उपभोग हा उत्पन्नाचे फलन होय. उपभोग प्रवृत्ती ही उपभोग खर्च व उत्पन्न ह्यात असणारा संबंध दर्शविते. उपभोग प्रवृत्तीच्या बाबतीत असे लक्षात येते की जसजसे उत्पन्न पातळी वाढत जाते तसा उपभोग खर्च सुद्धा वाढतो. मात्र उपभोग प्रवृत्ती घटत जाते. उत्पन्न पातळीत होणा.या वाढीच्या मानाने उपभोगात होणा.या वाढीचे प्रमाण कमी असते. उपभोग प्रवृत्तीचे खालील दोन प्रकार पडतात.

१) सरासरी उपभोग प्रवृत्ती - एका विशिष्ट कालावधीत एकूण उपभोग खर्चाचे एकूण उत्पन्नाशी असलेले प्रमाण म्हणजे सरासरी उपभोग प्रवृत्ती होय.

सरासरी उपभोग प्रवृत्ती = एकूण उपभोग खर्च ÷ एकूण उत्पन्न (APC = C÷Y)

म्हणजेच, एकूण उत्पन्न = एकूण उपभोग + एकूण बचत (Y = C+ S)

२) सीमांत उपभोग प्रवृत्ती - एकूण उपभोगात होणार्या बदलांचे एकूण उत्पन्नात होणा.या बदलांशी असणारे प्रमाण म्हणजे सीमांत उपभोग प्रवृत्ती होय.

सीमांत उपभोग प्रवृत्ती = ∆एकूण उपभोग खर्च ÷∆एकूण उत्पन्न

MPC = ∆C ÷ ∆Y

येथे,

MPC = सीमांत उपभोग प्रवृत्ती

∆C = एकूण उपभोगात होणारा बदल

∆Y = एकूण उत्पन्नात होणारा बदल

सर्वसामान्यपणे असे लक्षात येते की जसे एकूण उत्पन्नात वाढ होते तसे एकूण उपभोगात वाढ होते. परंतु एकूण उपभोगात होणारी वाढ ही एकूण उत्पन्नात होणा.या वाढीपेक्षा कमी आहे. त्यामुळे असे लक्षात येते की सरासरी व सीमांत उपभोग प्रवृत्ती उत्तरोत्तर घटत जाते. सरासरी उपभोग प्रवृत्ती ही केव्हाही सीमांत उपभोग प्रवृत्तीपेक्षा जास्त असते. व्यक्तीचे एकूण उत्पन्न शून्य होऊ शकते परंतु त्याचा उपभोग हा शून्य कधीच होऊ शकत नाही. त्याला जीवन जगण्यासाठी थोडाफार खर्च करावाच लागतो. अशा वेळेस बचती ह्या ऋणात्मक होतात.

केन्स प्रणित सिद्धांतामध्ये उपभोग प्रवृत्ती बद्दल पुढील बाबी आढळून आल्या.

१) सीमांत उपभोग प्रवृत्ती = उपभोगात बदल ÷ प्राप्तीत बदल.

२) सरासरी उपभोग प्रवृत्ती = उपभोगावर विनियोग ÷ विनियोग योग्य प्राप्ती

विनियोग = उपभोगावर एकूण खर्च

विनियोग योग्य प्राप्ती = एकूण प्राप्ती - (सरकारी कर, फी, दंड)

३) सरासरी बचत प्रवृत्ती = बचत $ विनियोगयोग्य प्राप्ती

४) सीमांत बचत प्रवृत्ती = बचतीतील वाढ - प्राप्तीत वाढ

५) उत्पन्न = उपभोग $ गुंतवणूक

६) गुंतवणूक = उत्पन्न – उपभोग

ISSN 2454-1974

७) उपभोग = उत्पन्न – गुंतवणूक

उपभोग प्रवृत्ती अल्पकाळात स्थिर असते. अल्पकाळामध्ये लोकांच्या उपभोग प्रवृत्तीत वाढ करता येत नाही परंतु विशिष्ट उपाययोजना केल्यास दीर्घकाळात उपभोग प्रवृत्ती मध्ये वाढ करता येते. त्यामुळे प्रो. केन्सने उपभोग प्रवृत्ती स्थिर असल्यामुळेच मंदीच्या काळात रोजगार पातळी वाढ करून गुंतवणूक वृद्धीवर भर दिला आहे ज्यामुळे मंदी नाहीशी होऊ शकेल उपभोग आणि बचत ह्या एकाच नाण्याच्या दोन बाजू असून त्यांच्या परस्परावर परिणाम होत असतो. उत्पन्नावर उपभोग आणि बचत दोन्ही अवलंबून असतात.

**सीमांत उपभोग प्रवृत्तीचे गुणधर्म**

१) सीमांत उपभोग प्रवृत्ती नेहमीच सकारात्मक असते. कारण एकूण उत्पन्नात वाढ होत असताना एकूण उपभोगातही वाढ होत असते.

२) सीमांत उपभोग प्रवृत्ती ही नेहमी एकाकापेक्षा कमी व शून्यापेक्षा जास्त असते. कारण कि एकूण उत्पन्नात होणा.या वाढीच्या मानाने एकूण उपभोग खर्चात होणारी वाढ ही कमी असते. उत्पन्नात झालेली वाढ पूर्णपणे बचत झाली असती तर उपभोग खर्च शून्य झाला असता. परंतु प्रत्यक्ष्यात ही गोष्ट शक्य नाही. म्हणून उपभोग प्रवृत्ती शून्यापेक्षा जास्त असते.

३) केन्सच्या सीमांत उपभोग प्रवृत्ती मध्ये असे आढळून येते कि, श्रीमंताच्या मानाने गरिबांची उपभोग प्रवृत्ती ही जास्त असते. ह्याचे कारण असे असू शकते कि, श्रीमंताच्या बहुतांश गरजा पूर्ण झालेल्या असतात. श्रीमंत व्यक्तीचे उत्पन्न वाढले तरी फारच कमी भाग उपभोगावर खर्च होतो. यामुळे या वर्गाच्या बचती वाढतात. याउलट गरीब वर्गाच्या मुलभूत गरजा सुद्धा पूर्ण होत नाही. यामुळे गरिबांचे उत्पन्न वाढले तरी ते फक्त उपभोगावर खर्च होते. म्हणून गरिबांची सीमांत उपभोग प्रवृत्ती जास्त असते व बचती कमी असतात.

**सीमांत उपभोग प्रवृत्ती व सरासरी उपभोग प्रवृत्ती ह्यांचा परस्पर सबंध**

उपभोगत्यांचा सीमांत उपभोग प्रवृत्ती व सरासरी उपभोग प्रवृत्ती ह्या दोन्ही उपभोग प्रवृत्ती सोबत जवळचा सबंध आढळतो. तो सबंध खालील प्रमाणे विषद केला आहे.

१) व्यक्तीच्या उत्पन्नात वाढ होत असताना सीमांत उपभोग प्रवृत्ती व सरासरी उपभोग प्रवृत्ती दोन्ही घटत असताना लक्षात येते.

२) दोन्ही प्रकारच्या प्रवृत्ती घटत असताना सीमांत उपभोग प्रवृत्ती ही सरासरी उपभोग प्रवृत्ती पेक्षा अधिक वेगाने घटत असते.

३) उपभोगत्यांचा जेव्हा सीमांत उपभोग प्रवृत्ती स्थिर असते तेव्हा सरासरी उपभोग प्रवृत्ती सुद्धा स्थिर असते.

४) जेव्हा व्यक्तीच्या उत्पन्नात वाढ होत असते तेव्हा सरासरी उपभोग प्रवृत्ती व सीमांत उपभोग प्रवृत्ती ह्या दोन्ही वाढतात. पण सरासरी उपभोग प्रवृत्ती पेक्षा सीमांत उपभोग प्रवृत्ती जोरात वाढते.

लॉर्ड केन्स च्या मते उपभोग प्रवृत्ती ही उत्पन्नाचे स्थिर फलन आहे. अर्थशास्त्री मिल्टन फ्राडमन ह्यांच्या मतानुसार, कायम उपभोग व कायम उत्पन्न ह्यात नेहमी प्रमाणशीर सबंध आढळतो. ह्याचा अर्थ सरासरी उपभोग प्रवृत्ती व सीमांत उपभोग प्रवृत्ती ह्या समान असतात. उत्पन्न व उपभोग ह्यांच्यातील बदलामध्ये प्रमाणशीर संबध असतो असे अर्थशास्त्री ड्यूसेनबरी सुद्धा मानतात.

**उपभोगाचा मानसशास्त्रीय नियम**

लॉर्ड केन्सने हा नियम उपभोग प्रवृत्तीच्या विश्लेषणाच्या आधारावर निर्मित केला. यासाठी काही गृहीतके मांडली. जसे की, देशामध्ये सर्वसाधारण राजकीय, आर्थिक, व्यापार चक्र ह्या सारखी परीस्थिती स्थिर असते, लोकांची मनोवृत्ती स्थिर असते, व्यक्तीचा उपभोग हा फक्त उत्पन्नावर अवलंबून असतो, अल्पकाळामध्ये उपभोगामध्ये कोणताही परिणाम होत नाही, तसेच सरकारी हस्तक्षेप नसणारी भांडवलशाही अर्थव्यवस्था असावी असे केन्सचे मत आहे. उपभोगाचा हा सिद्धांत लोकांच्या मनोवृत्तीवर अवलंबून असल्यामुळे याला उपभोगाचा मानसशास्त्रीय नियम किंवा उपभोगाचा मुलभूत सिद्धांत असे म्हणतात. लॉर्ड केन्सच्या मते, उत्पन्नात जसजशी वाढ होते तसतशी लोकांमध्ये सामान्यपणे व सरासरीने आपल्या उपभोगत वाढ करण्याची प्रवृत्ती असते. परंतु उत्पन्नात जेवढी वाढ होते तेवढी उपभोगात होत नाही.

१) एकूण उत्पन्नात वाढ होत असताना एकूण उपभोग खर्चात वाढ होत असते असताना एकूण उपभोग खर्चात सुद्धा वाढ होते. परंतु उपभोग खर्चात होणारी वाढ ही उत्पन्नात होणा.या वाढीपेक्षा कमी असते. उत्पन्नातील वाढ ही उपभोगात होणा.या वाढी पेक्षा जास्त असते.

ISSN 2454-1974

२) लोकांच्या उत्पन्नात वाढ झाली की, आपोआप उपभोग आणि बचतीमध्ये वाढ होऊ लागते. त्यामुळे साहजिकच उत्पन्नातील वाढ ही बचतीतील वाढ आणि उत्पन्नातील वाढी च्या बेरजे एवढे असते.

३) उत्पन्नात वाढ झाली असता उपभोग व बचत ह्या दोन्ही प्रवृतीमध्ये वाढ होते. सर्व सामान्य व्यक्ती मनोरंजन, सुखद गोष्टी यावर अधिक खर्च करू लागतात त्यामुळे उपभोग प्रवृत्ती मध्ये वाढ होते.

**उपभोग प्रवृत्ती प्रभावित करणारे घटक**

व्यक्तीच्या उपभोग प्रवृत्तीवर प्रभाव टाकणारे विविध घटक पुढील प्रमाणे आहेत. त्याचे वर्गीकरण प्रो. केन्सने खालील प्रमाणे केले आहे.

**अ) व्यक्तिनिष्ठ घटक -** व्यक्तिनिष्ठ घटकांमध्ये व्यक्तीच्या स्वभाव, मानसशास्त्रीय वैशिष्ट्ये, सामाजिक व्यवस्था, सामाजिक समस्या, वैयक्तिक गरजा ई. समावेश होतो. ह्या सर्व बाबी उपभोगात बदल करण्यासाठी कारणीभूत ठरतात.

१) खर्चिक किंवा कंजूष स्वभाव २) स्वावलंबन हेतू

३) प्रगती हेतू ४) व्यावसायिक हेतू

५) प्रतिष्ठा मिळविण्याचा हेतू ६) लाभ मिळविण्याच्या हेतू

७) दूरदृष्टीचा हेतू ८) सुरक्षितता हेतू

**ब) वस्तुनिष्ठ घटक-** वस्तुनिष्ठ घटकाची परिमाणात्मक मापन करता येते. त्याची परीक्षण व निरीक्षण करून मोजणी करता येते. उपभोग प्रवृत्तीवर अर्थव्यवस्थेतील खालील वस्तूनिष्ठ घटकांचा समावेश होतो.

१) उत्पन्नातील बदल २) आवडीनिवडी, रूढी, परंपरा

३) उत्पन्न वाटणीतील विषमता ४) भविष्यकालीन किमतीचा अंदाज

५) कर्जाची परतफेड ६) व्याजदरात बदल

७) कर व सार्वजनिक कर्ज ८) काटकसरी समाज

९) नवीन उत्पादनाची उपलब्धता १०) प्रदर्शन प्रभाव

**निष्कर्ष** –

देशाचे रोजगार, उत्पन्न, उपभोग हे तीनही घटक परस्परावर अवलंबून असून त्या एकाच वेळी निश्चित होतात. त्याचप्रमाणे रोजगार, उत्पन्न व उपभोग हे समदिशेने बदलणारे घटक आहे. देशातील रोजगाराची पातळी ही समाजाच्या एकूण प्रभावी मागणीवर अवलंबून आहे. देशातील प्रभावी मागणी वाढल्यास रोजगार क्षमतेत वाढ होते आणि प्रभावी मागणी घटल्यास देशातील रोजगार क्षमतेत घट होते. देशामध्ये रोजगाराची पातळी टिकविण्यासाठी ती पातळी असताना लोकांना एकंदर जेवढे उत्पन्न मिळते त्या उत्पन्नातून जेवढी बचत केली जाईल, तेवढीच भांडवल गुंतवणुक होत असल्यास रोजगाराची ती पातळी टिकविणे शक्य होते. अर्थव्यवस्थेत लोकांचा एकूण उपभोगच बचत ठरवीत असते कारण बचत म्हणजेच उपभोग न केलेला उत्पन्नाचा भाग असतो. बचतच भांडवलाचा राष्ट्रीय पुरवठा तयार करण्यासाठी महत्त्वाचा घटक असतो.मुख्य प्रवाहातील अर्थशास्त्रज्ञांच्या मते वस्तू आणि सेवांचा ग्राहकांनी घेतलेला अंतिम सेवनच उपभोग बनते.

**संदर्भ ग्रंथ**

१) उखळकर, ए. एस.(२०१४), आयकर, साकोडे, प्रिंट सोल्यूशन,महाल, नागपूर. पृ. क्र. १४ ते २३.

२) देशपांडे, ज्योत्स्ना (२०१९), विकासाचे अर्थशास्त्र, पिंपळापुरे अँड कं. पब्लिशर्स, नागपूर. पृ. क्र.११ ते २०.

३) कोलते, एस.एम.(२०२१), व्यावसायिक पर्यावरण, पिंपळापुरे अँड कं. पब्लिशर्स, नागपूर. पृ. क्र. १४ ते २२.

ISSN 2454-1974

४)यादव संतोषकुमार (२०२१), समग्रलक्षी अर्थशास्त्रीय सिद्धांत, कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक. पृ. क्र. ११ ते ३८.

५) वाईगडे राजकुमार (२०२१), अंशलक्षी आर्थिक विश्लेषण (भाग.१), कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक. पृ. क्र. ६२ ते ७८.

६) देशपांडे, ज्योत्स्ना (२०१९), श्रमाचे अर्थशास्त्र, पिंपळापुरे अँड कं. पब्लिशर्स, नागपूर. पृ. क्र.१६७ ते १७९.

७) शेळके माधव (१९८०), स्थूल अर्थशास्त्र, पिंपळापुरे अँड कं. पब्लिशर्स, नागपूर. पृ. क्र.२४० ते २७१.

८) झामरे जी. एन.(२०२१), स्थूल अर्थशास्त्र, पिंपळापुरे अँड कं. पब्लिशर्स, नागपूर. पृ. क्र. ११३ ते १२७.

९) खेर सी., गोगटे अनिता, राजदेकर उमेश(२००१), समग्रलक्षी अर्थशास्त्र व राष्ट्रीय उत्पन्न, कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक. पृ. क्र. १३ ते ५७.

ISSN : 2347 - 4777

# International Journal of Cultural Studies and Social Sciences

## CERTIFICATE OF PUBLICATION

This is to certify that the article entitled

**बचत आणि गुंतवणूक परस्पर संबंधविषयक दृष्टीकोन**

Authored By

**डॉ. सुरेश आर. भालतडक**
संशोधक सहाय्यक प्राध्यापक, कला व वाणिज्य महाविद्यालय वरवट बकाल ता. संग्रामपूर, जिल्हा-बुलढाणा

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

Published in

International Journal of Cultural Studies and Social Sciences
ISSN **2347-4777** with IF=7.138
Vol-**20**, Issue-**01**, No.**20**, January - June: **2024**

ज्ञान-विज्ञान विमुक्तये
UGC
University Grants Commission

Double-Blind, Peer Reviewed, Refereed & Open Access, UGC CARE Listed Journal

Chief Editor
Tapu Biswas

# बचत आणि गुंतवणूक परस्पर संबंधविषयक दृष्टीकोन

**डॉ.सुरेश आर. भालतडक** संशोधक सहाय्यक प्राध्यापक, कला व वाणिज्य महाविद्यालय वरवट बकाल ता.संग्रामपूर, जिल्हा-बुलढाणा. पिन -४४४२०२ **Mob.** 9527490056 Email Id- sureshbhaltadak@gmail.com

**सारांश**

बचत आणि गुंतवणुक समान असण्याची कारण म्हणजे विशिष्ट कालावधीमध्ये पूर्ण रोजगाराची स्थिती असणे होय. परंतु जर पूर्ण रोजगाराची स्थिती जर देशामध्ये नसेल तर बचत आणि गुंतवणुकीमध्ये असमानता निर्माण होईल आणि ही असमानता व्याज दराच्या तंत्राद्वारे दूर करता येईल. जर व्याजाचा दर वाढत गेला तर बचती वाढतील आणि गुंतवणूक घटेल. तर याउलट स्थितीमध्ये व्याजाचा दर घटल्यास बचत घटतील आणि गुंतवणूक वाढेल. व्याजाचा दर आणि बचत यामध्ये समसंबंध असून व्याजाचा दर आणि गुंतवणूक यामध्ये व्यस्त संबंध आहे. कोणत्याही वेळेस गुंतवणुकीच्या तुलनेत बचत कमी होत असेल तर व्याज दर वाढतो आणि बचत तोपर्यंत वाढते जोपर्यंत बचत आणि गुंतवणूक समान होत नाही. या उलट परिस्थितीमध्ये गुंतवणुकीच्या तुलनेत बचत अधिक असते तेव्हा व्याजदर घटते आणि बचत तोपर्यंत घटत जाते जोपर्यंत नवीन व्याजदरावर बचत आणि गुंतवणूक समान होत नाही. बचत गुंतवणूक समानतेसंबंधी केन्सने दोन विचारधारा प्रस्तुत केल्या. त्यांच्या मते बचत आणि गुंतवणुकीमध्ये लेखांकन आणि परिभाषिक समानता हे राष्ट्रीय उत्पन्न लेखांकनाच्या उपयोगी येऊ शकते. सर्व कालावधीमध्ये उत्पन्नाच्या कोणत्याही स्तरावर वास्तविक बचत तसेच वास्तविक गुंतवणूक नेहमीच समान असते. दुसरा विचार फलनात्मक समानता संबंधी आहे. याच्यानुसार बचत आणि गुंतवणूक उत्पन्नाच्या संतुलन स्तरावर समान असतात. फलनात्मक दृष्टीने बचत आणि गुंतवणूक केवळ समान नाही तर संतुलन अवस्थेमध्ये सुद्धा असतात.

**Keyword** – बचत, गुंतवणूक, परस्पर संबंध

## प्रस्तावना

उत्पन्न, उपभोग, बचत आणि गुंतवणूक ह्या परस्पर संबंधित आर्थिक क्रिया आहे. ह्या चार ही क्रिया एकमेकावर अवलंबून असतात. उत्पन्नावर उपभोग अवलंबून असते. जेवढे उत्पन्न वाढते, तेवढा उपभोग वाढत चालतो, परंतु वाढलेल्या उत्पन्नाच्या प्रमाणात उपभोग वाढत नाही. तेव्हा वाढलेले उत्पन्न आणि कमी झालेला उपभोग यामधील फरक म्हणजे बचत होय. बचत हा एक वैयक्तिक गुण आहे परंतु सामाजिक दोष आहे याबाबत अर्थतज्ञ मध्ये मोठ्या प्रमाणात मतभेद आहेत. केन्सच्या मते गुंतवणूक ही राष्ट्रीय उत्पन्न व रोजगार क्षमतेमध्ये वाढ होईल अशा प्रकारची असते. केन्सच्या मते गुंतवणुकीचा संबंध अशा प्रकारच्या वास्तविक गुंतवणुकीशी आहे ज्या माध्यमातून भांडवली वस्तूंच्या उत्पादनामध्ये वाढ होईल. ह्या भांडवली वस्तू उत्पादन आणि लोकांचे क्रय क्षमता वाढवून लोकांचे उत्पन्न तसेच उत्पादन स्तर सुद्धा वाढवते.

## पूर्व साहित्याचा आढावा

1) Ramesh D. (2017), "The Effect of Education on efficiency in consumption saving and

Investment", Ph.D. Thesis, Maharaja Sayajirao University, Baroda, यांच्या शोध निबंधामध्ये असे निदर्शनास आले किए बचत ए गुंतवणुक यांचा परस्पराशी सकारात्मक सबंध असून यावर शिक्षणाचा परिणाम होतोण्

2) Kuchanur Aadinath B. (2017), "Household Savings and Investments: A key driver of Indian Financial System", International Journal in Management and Social Science.5(1) pg:263-274, Jan. यांच्या शोध पत्रिकेमध्ये असे निदर्शनास आले किए व्यक्ती एक किंवा अनेक व्यवसायांमध्ये गुंतलेली असतात आणि त्याद्वारे उत्पन्न मिळवतात आणि अशा उत्पन्नामधून वेळोवेळी बचत आणि गुंतवणूक करण्यासाठी त्यांना अनेक घटकांनी प्रेरित केले जाते.

3) Dr. C. Thilakam, P. Santhanam (2017), "Saving and Investment Behaviour of Private Sector Employees in Tirunelveli District", Sumedha Journal of Management, Vol.6, No.1, यांच्या शोध पत्रिकेमध्ये असे निदर्शनास आले किए सामान्य व्यकी सुरक्षित गुंतवणूक करण्यास भर देतात आणि त्यांच्या बचती सुरक्षित ठेवतात.

**संशोधनाचे महत्व**

प्रस्तुत संशोधनामधून बचत आणि गुंतवणूक परस्पर सबंध अभ्यासण्यात आला असून यामाध्यमातून बचत आणि गुंतवणूक संबंधीचे विविध दृष्टीकोन यांचे चिकित्सक अध्ययन करण्यात आले आहेण् या संशोधन लेखाच्या माध्यमातून बचत आणि गुंतवणूक परस्पर सबंध उलगडण्यास आणखी मदत होईलण्

**संशोधनाचे उद्दिष्टे**

1)बचत संकल्पना स्पष्ट करून बचतीचे निर्धारक घटक अभ्यासणेण्

2)गुंतवणूक संकल्पना स्पष्ट करून गुंतवणूकीचे निर्धारक घटक अभ्यासणेण्

3)बचतीचा विरोधाभास अभ्यासणेण्

4)बचत आणि गुंतवणूक परस्पर सबंध अभ्यासणेण्

**संशोधन पद्धती**

प्रस्तुत संशोधनासाठी बचत व गुंतवणुकीसंबंधी विविध लेखए शोध प्रबंधए शोध पत्रिकाए ग्रंथए संदर्भ पुस्तके यासारख्या दुय्यम माहिती स्त्रोताद्वारे तथ्य संकलित करण्यात आले असून त्यावरून निष्कर्ष प्रस्थपित करण्यात आले आहेत.

**बचत**

केन्स च्या मतानुसार उत्पन्नाचे उपभोग खर्चावरील आधिक्य म्हणजे बचत होय. क्रोथरच्या मतानुसार बचत हे उत्पन्नाचा असा भाग असतो जो व्यक्तीने उपभोगावर खर्च केलेला नसतो. व्यक्ती जेवढा उपभोग टाळतो तेवढाच तो बचत करू शकतो.

बचत = एकूण उत्पन्न - उपभोग खर्च

उत्पन्न, उपभोग आणि बचत यांचा परस्पर संबंध अतिशय जवळचा आहे. लोकांचे उत्पन्न जेव्हा शून्य होते, तेव्हा या परिस्थीती मध्ये सुद्धा उपभोग खर्च हा शून्य होऊ शकत नाही. कारण जीवन जगण्यासाठी काही ना काही उपभोग खर्च हा व्यक्तीला करावाच लागतो म्हणजे उपभोग खर्च हा शून्य होऊ शकत नाही. अशा परिस्थितीत त्याच्या बचती मात्र ऋणात्मक होतात याचा आपणास नेहमी प्रत्यय येतो. उत्पन्न आणि उपभोग खर्च यांच्या परस्पर संबंधाला उपभोग प्रवृती असे म्हणतात. त्याचप्रमाणे उत्पन्न आणि बचत यांच्या परस्पर संबंधाला बचत प्रवृती असे म्हणतात.बचत

प्रवृत्तीचे खालील दोन प्रकार पडतात.

**१) सरासरी बचत प्रवृत्ती**

एकूण बचतीशी उत्पन्नाचे असलेले प्रमाण म्हणजेच सरासरी बचत होय. सरासरी बचत ही व्यक्तीच्या एकूण बचतीला त्याच्या उत्पन्नाने भागल्यानंतर प्राप्त होते. व्यक्तीला झालेला उत्पन्नाचा जेवढा भाग उपभोग खर्च केल्यानंतर जी उर्वरित रक्कम असते ती बचत असते. तेव्हा,

∴ $APS = APS = S \div Y$

APS = Average Propensity to Save

S = Savings Y= Yields

**२) सीमांत बचत प्रवृत्ती**

सीमांत बचत म्हणजे उत्पन्नाच्या बदलामुळे बचतीमध्ये जो बदल होते त्यास सीमांत बचत प्रवृत्ती म्हणतात.

$MPS = \Delta S \div \Delta Y$

MPS= Marginal Propensity to Save.

$\Delta S$ = Change in Savings

$\Delta Y$ = Change in Income

**बचतीचे निर्धारक घटक**

व्यक्तीची बचत निर्धारण करणारे घटक हे व्यक्तीची मानसिकता, बचत करण्याची क्षमता आणि अर्थव्यवस्थेमधील सुविधा यावर अवलंबून असते. या तीन निर्धारक घटकांची माहिती पुढील प्रमाणे.

**अ) व्यक्तीची मानसिकता**

| | |
|---|---|
| १) भविष्यकालीन सुरक्षितता | २) सावधानी |
| ३) जीवन स्तर | ४) गुंतवणूक करण्याची इच्छा |
| ५) उद्योग व्यवसायाच्या वाढीसाठी | ६) आर्थिक स्वावलंबी |
| ७) सामाजिक प्रतिष्ठान | ८) कंजूष स्वभाव प्रवृती |

**ब) बचत करण्याची क्षमता**

| | |
|---|---|
| १) राष्ट्रीय उत्पन्न | २) दरडोई उत्पन्न |
| ३) नैसर्गिक संसाधने | ४) व्यापार |
| ५) औद्योगिक विकास | ६) संपत्तीची वितरण |

**क) बचत करण्याची सुविधा**

| | |
|---|---|
| १) शांती आणि सुरक्षा | २) आधिकोष सुविधा |
| ३) कर धोरण | ४) किमंत स्थिरता |
| ५) गुंतवणुकीच्या संधी | ६) सरकारची आर्थिक नीती |

**गुंतवणूक**

केन्सच्या मते गुंतवणूक ही राष्ट्रीय उत्पन्न व रोजगार क्षमतेमध्ये वाढ होईल अशा प्रकारची असते. केन्सच्या मते गुंतवणुकीचा संबंध अशा प्रकारच्या वास्तविक गुंतवणुकीशी आहे ज्या माध्यमातून भांडवली वस्तूंच्या उत्पादनामध्ये वाढ होईल. ह्या भांडवली वस्तू उत्पादन आणि लोकांचे

क्रय क्षमता वाढवून लोकांचे उत्पन्न तसेच उत्पादन स्तर सुद्धा वाढवते. अशा प्रकारची गुंतवणूक ही नवीन कंपनी चे शेअर, सडक, इमारती, धरणे ई. मध्ये असू शकते. केन्सच्या मते भांडवली स्वरूपाची गुंतवणूक हीच खरी गुंतवणूक आहे. वास्तविक गुंतवणूक म्हणजे राष्ट्रीय उत्पन्न व रोजगार क्षमतेमध्ये वाढ करणारी गुंतवणूक होय. यामध्ये यंत्रसामग्री व सयंत्रे, उपकरणे व अवजारे, नवीन बांधकामे, वस्तूंचा साठा यांचा समावेश होतो.

**गुंतवणुकीचे प्रकार**

१) प्रेरित गुंतवणूक २) स्वायत्त गुंतवणूक

३) खाजगी गुंतवणूक ४) सार्वजनिक गुंतवणूक

५) सकल आणि शुध्द गुंतवणूक

६) एच्छिक गुंतवणूक व अनैच्छिक गुंतवणूक

**गुंतवणुकीची सीमांत उत्पादकता**

देशाच्या आर्थिक प्रगतीमध्ये गुंतवणुकीला अतिशय महत्वाचे स्थान आहे कारण गुंतवणुकीमुळे रोजगार, राष्ट्रीय उत्पन्न, दरडोई उत्पन्न यामध्ये वाढ होते. त्यामध्ये वाढ झाल्यानंतर देशांमध्ये उपभोग घेतल्यानंतर उर्वरित माल निर्यात केल्यानंतर मोठ्या प्रमाणात परकीय चलन मिळू शकते. मोठ्या प्रमाणातील परकीय चलन आर्थिक विकासासाठी पोषक असते. तेव्हा अर्थव्यवस्थेमध्ये गुंतवणूक अतिशय महत्त्वाची असून ती कशी निर्धारित होते याबद्दलचे विविध मतप्रवाह आहेत.

सनातनवादी अर्थशास्त्रीच्या मते व्याजदर व गुंतवणुक यामध्ये व्यस्त सबंध आहे. व्याजदर जास्त असल्यास गुंतवणुकीचे पातळी कमी असते व व्याजदर कमी असल्यास गुंतवणुकीची पातळी जास्त असते.परंतु व्याजदर आणि बचत यामध्ये सम सबंध आहे. व्याजदर जास्त असल्यास बचत जास्त असते व्याजदर कमी असल्यास बचत कमी असते. सनातनवाद्याचे हे विचार केन्सला पटले नाही. त्याच्यामध्ये व्याजदरातील बदल गुंतवणुकीला आकर्षित करू शकत नाही. कारण लोकांची मनोप्रवृत्ती, अर्थव्यवस्थेतील नफ्याची क्षमता इत्यादी घटक गुंतवणुकीला प्रोत्साहित करते. त्यांच्या मते भांडवलाची सीमांत कार्यक्षमता गुंतवणुकीला प्रभावित करते. भांडवलाची सीमांत कार्यक्षमता म्हणजे विशिष्ट भांडवली गुंतवणुकीपासून अपेक्षित नफ्याचा दर होय.

**गुंतवणुकीचे निर्धारक घटक**

१) अनिश्चितता तत्व २) भांडवली वस्तूचा वर्तमान साठा

३) उत्पन्नाचा स्तर ४) उपभोक्ता मागणी

५) तरल संपत्ती ६) बचत

७) नवप्रवर्तन ८) लोकसंख्या वाढ

९) नव्या क्षेत्रांचा विकास १०) लोकांची उपभोग प्रवृत्ती

बचत आणि गुंतवणूक परस्पर सबंध

बचत आणि गुंतवणूक ह्या समान अर्थाने वापरले जाणा.या संकल्पना आहे. अर्थशास्त्री च्या मते सुद्धा बचत आणि गुंतवणुकीमध्ये काही अंशी समानता आढळते. या समानते बद्दलच्या विविध विचारधारा पुढील प्रमाणे.

**बचत आणि गुंतवणुकीच्या परस्पर सबंधाबाबत सनातन विचारधारा**

सनातनवादी अर्थतज्ज्ञांचा असा विश्वास होता की अर्थव्यवस्थेमध्ये नेहमी पूर्ण रोजगाराची

स्थिती असते आणि त्यामुळेच बचत आणि गुंतवणूक नेहमीच समान असते. त्यांच्या मतानुसार बचत आणि गुंतवणूक हे व्याजदराची फलन आहे. त्यामुळे गणितीय भाषेत ते पुढीलप्रमाणे मांडता येईल.

S = f (r)

I = f (r)


म्हणूनच S = I

S ¾ बचत, I ¾ गुंतवणूक, r ¾ व्याज दर, f ¾ फलन

बचत आणि गुंतवणुक समान असण्याची कारण म्हणजे विशिष्ट कालावधीमध्ये पूर्ण रोजगाराची स्थिती असणे होय. परंतु जर पूर्ण रोजगाराची स्थिती जर देशामध्ये नसेल तर बचत आणि गुंतवणुकीमध्ये असमानता निर्माण होईल आणि ही असमानता व्याज दराच्या तंत्राद्वारे दूर करता येईल. जर व्याजाचा दर वाढत गेला तर बचती वाढतील आणि गुंतवणूक घटेल. तर याउलट स्थितीमध्ये व्याजाचा दर घटल्यास बचत घटतील आणि गुंतवणूक वाढेल. व्याजाचा दर आणि बचत यामध्ये समसंबंध असून व्याजाचा दर आणि गुंतवणूक यामध्ये व्यस्त संबंध आहे. कोणत्याही वेळेस गुंतवणुकीच्या तुलनेत बचत कमी होत असेल तर व्याज दर वाढतो आणि बचत तोपर्यंत वाढते जोपर्यंत बचत आणि गुंतवणूक समान होत नाही. या उलट परिस्थितीमध्ये गुंतवणुकीच्या तुलनेत बचत अधिक असते तेव्हा व्याजदर घटते आणि बचत तोपर्यंत घटत जाते जोपर्यंत नवीन व्याजदरावर बचत आणि गुंतवणूक समान होत नाही. खालील आलेखावरून बचत आणि गुंतवणुकीचा परस्पर संबंध स्पष्ट होते.

**आलेख क्र. ४.२**

**बचत आणि गुंतवणूक संबंध दर्शक आलेख**




**सनातनवादी विचारधारेवर टीका**

आधुनिक अर्थतज्ञांनी गुंतवणूक आणि बचतीच्या समानतेबाबत अभिमतपंथी विचारधारेवर टीका केली.

१) केन्सच्या मते बचत आणि गुंतवणुकीमध्ये समानता व्याज दराच्या माध्यमातून स्थापन होत नाही. त्याच्या मतानुसार उत्पन्नामधील परिवर्तन बचत आणि गुंतवणुकीमध्ये समानता प्राप्त करते.

२) केन्सचा याबाबतीत सुद्धा विरोध आहे की, व्याजदराच्या माध्यमातून आणलेली समानता फक्त गुंतवणूक वक्र सरकवित नाही तर बचत वक्राला पण सरकवितो. त्यांच्या मतानुसार गुंतवणूक

वक्र परिवर्तित झाला म्हणजे बचत वक्र आपोआप परिवर्तित होतो. उदाहरणार्थ जर गुंतवणूक गुंतवणुकीमध्ये वृद्धी गुणक प्रभावाच्या माध्यमातून निर्माण होत असेल तर बचतीमध्ये आपोआप परिवर्तन होते.

३) केन्स या परंपरावादी विचाराचा सुद्धा खंडन करतो की, पूर्ण रोजगाराच्या स्थितीमध्ये बचत आणि गुंतवणूक एक समान होते. त्याच्यामध्ये पूर्ण रोजगार हे एक असाधारण स्थिती आहे. वास्तविकपणे बचत व गुंतवणूकीमध्ये समानता अपूर्ण रोजगार स्थितीमध्ये होत असते.

**केन्सवादी विचारधारा**

बचत गुंतवणूक समानतेसंबंधी केन्सने दोन विचारधारा प्रस्तुत केल्या. त्यांच्या मते बचत आणि गुंतवणुकीमध्ये लेखांकन आणि परिभाषिक समानता हे राष्ट्रीय उत्पन्न लेखांकनाच्या उपयोगी येऊ शकते. सर्व कालावधीमध्ये उत्पन्नाच्या कोणत्याही स्तरावर वास्तविक बचत तसेच वास्तविक गुंतवणूक नेहमीच समान असते. दुसरा विचार फलनात्मक समानता संबंधी आहे. याच्यानुसार बचत आणि गुंतवणूक उत्पन्नाच्या संतुलन स्तरावर समान असतात. फलनात्मक दृष्टीने बचत आणि गुंतवणूक केवळ समान नाही तर संतुलन अवस्थेमध्ये सुद्धा असतात.

**१) लेखांकन अथवा पारिभाषिक समानता -** केन्सने आपले पुस्तक General Theory मध्ये असे मत मांडले की, बचत आणि गुंतवणूक समस्त समुदायासाठी संख्यात्मक अनिवार्य समान असतात कारण ते एकाच बाबीचे विभिन्न पक्ष आहेत. चालू काळामध्ये बचत आणि गुंतवणूकीला चालू उत्पन्नाने, चालू उपभोगाच्या आधिक्य स्वरूपात परिभाषित केले आहे.

$S_t = Y_t - C_t$ ....1

$I_t = Y_t - C_t$ .....2

$\therefore \quad S_t = I_t$

या ठिकाणी $S_t$ म्हणजे चालू काळातील बचत, $Y_t$ म्हणजे चालू काळातील उत्पन्न, $C_t$ म्हणजे चालू काळातील उपभोग, $I_t$ म्हणजे चालू गुंतवणूक होय.

यानुसार, $Y_t = C_t + I_t$ ....1

$Y_t = S_t + C_t$ .....2

वरील दोन्हीही समीकरणा पासून

$C_t + I_t = S_t + C_t$

म्हणून $I_t = S_t$

याप्रकारे बचत आणि गुंतवणुकीमध्ये समरूपता आहे. तसेच बचत आणि गुंतवणूक दोन्ही उत्पन्न आणि उपभोगामधील अंतर आहे ते अशाप्रकारे परिभाषित केली आहे की दोन्ही नेहमी समान असतात.

**२) फलनात्मक समानता -** फलनात्मक दृष्टीने बचत आणि गुंतवणुकीमध्ये समानता आणण्याचे कार्य समायोजनकारी तंत्र करत असते जो व्याज दरामधील परिवर्तन संबंधित अभिमत विचारधारेच्या विरुद्ध आहे. यामध्ये केवळ उत्पन्नाच्या संतुलन स्तरावर बचत आणि गुंतवणूक समान होते. उत्पन्न फलनात्मक रूपामध्ये बचत आणि गुंतवणुकी सोबत संबंधित राहते. जेव्हा गुंतवणुकीच्या तुलनेत बचत वाढते तेव्हा उत्पन्न घटत जाते आणि जेव्हा बचतीच्या तुलनेत गुंतवणूक वाढते तेव्हा उत्पन्न वाढत जाते. उत्पन्न बचत आणि गुंतवणूक मधील परिवर्तनाचा हे प्रावैगिक प्रक्रिया तोपर्यंत

सतत चालू राहते जोपर्यंत बचत आणि गुंतवणुकीच्या मध्ये समानता प्राप्त होत नाही.

**बचत आणि गुंतवणुकीच्या परस्पर सबंधाबाबत ईतर दृष्टिकोन**

प्रो. रॉबर्टसन, स्वीडनचे ओलिन सारख्या अर्थतज्ञ याबाबतीत सहमत नव्हते की बचत आणि गुंतवणूक अनिवार्यता समान असते.रॉबर्टसन यांनी कालावधी दृष्टिकोन निर्माण केला. त्यांच्या परिभाषेनुसार भूतकाळातील उत्पन्न आणि चालू उपभोग खर्च यामधील अंतरच बचत असते, म्हणजेच $S_t = Y_{t-1} - C_t$]जेथे $Y_{t-1}$ भूतकाळातील उत्पन्न असते. चालू उत्पन्न म्हणजे चालू उपभोग आणि चालू गुंतवणूक अर्थात $Y_t = C_t + I_t$ होय. यानुसार प्रा. रॉबर्टसन च्या परिभाषेनुसार चालू काळातील भांडवली वस्तू वरील खर्च हाच केन्सियन गुंतवणूक होय. रॉबर्टसन यांच्या मते बचत आणि गुंतवणूक ह्या दोन्ही समान नसतात ते खालील सूत्राने स्पष्ट होते.

$S_t = Y_{t-1} - C_t$

$Y_{t-1} = C_t + S_t$

आणि $Y_t = C_t + I_t$

Hence, $Y_t - Y_{t-1} = C_t + I_t - C_t + S_t$

$= I_t - S_t$

याठिकाणी, St ¾ चालू काळातील बचत,

$Y_{t-1}$ ¾ भूतकाळातील उत्पन्न,

$C_t$ ¾ चालू उपभोग,

$I_t$ ¾ चालू गुंतवणूक,

$Y_{t-1}$ ¾ भूतकाळातील उत्पन्न

अशाप्रकारे भूतकाळातील उत्पन्न हे वर्तमान काळातील उत्पन्न वाढविणे त्यामुळे चालू गुंतवणूक चालू बचतीच्या बरोबर नसतात किंवा त्याच परिस्थितीमध्ये चालू उत्पन्न भूतकाळातील उत्पन्नाच्या बरोबर असतील जेव्हा चालू गुंतवणूक चालू बचतीच्या बरोबर असतील कारण चालू उत्पन्न भूतकाळातील उत्पन्नाच्या बरोबर नसतात.

**स्वीडनच्या अर्थतज्ज्ञाच्या दृष्टिकोनातून**

स्वीडनच्या ओलीन, लुंडबर्ग, लिंडाल, मिर्डल सारख्या अर्थतज्ज्ञाच्या मते बचत आणि गुंतवणूक दोन प्रकारची असतात.

**१) प्रात्यक्षित बचत व गुंतवणूक** - प्रत्यक्ष बचत किंवा गुंतवणूक म्हणजे पूर्वानुमानित, अभिष्ट अथवा योजनाबद्ध असतील किंवा लोकांची तशा प्रकारची इच्छा असू शकते.

**२) यथार्थ बचत किंवा गुंतवणूक** - यथार्थ बचत किंवा गुंतवणूक म्हणजे वास्तविकपणे केली जाणारी होय.

स्वीडनच्या अर्थतज्ञ च्या मते यथार्थ बचत आणि गुंतवणूक नेहमी समान असते परंतु प्रत्यक्षात बचत आणि गुंतवणूक प्रत्येक वेळी समान असेल हे सांगता येत नाही. कारण ज्या लोकांच्या योजना, पूर्वानुमान विभिन्न असून विविध उद्देशाने प्रभावित आहेत या लोकांच्या प्रत्याशीत बचत आणि गुंतवणूक पूर्ण होतीलच याची शक्यता नाही. त्यामुळे प्रत्यक्ष बचत आणि गुंतवणूक समान असतीलच याची शक्यता नाही. जेव्हा प्रत्याशित बचतीमुळे प्रत्याशित गुंतवणूक वाढते, तेव्हा व्यावसायिक क्रियांचा प्रसार होऊन उत्पन्न सुद्धा वाढते. वाढलेल्या उत्पन्नामुळे जी बचत वाढते ही

वास्तविक बचत, यथार्थ गुंतवणुकीला वाढवीते यामुळे उत्पन्नाच्या उच्चस्तरावर बचत आणि गुंतवणूक बरोबर असतात. याच्या विपरीत जेव्हा यथार्थ गुंतवणुकीमुळे यथार्थ बचत वाढेल तेव्हा व्यावसायिक क्रिया कमी होत जाऊन उत्पन्न कमी होत जाऊन, घटलेल्या उत्पन्नामुळे जी बचत निर्माण होईल ते यथार्थ बचतीला कमी करून यथार्थ गुंतवणुकीच्या स्तरावर घेऊन जाईल. तेव्हा निम्न स्तरावर बचत आणि गुंतवणूक समान असतील.

**निष्कर्ष**

सर्वसामान्यपणे बचत आणि गुंतवणूक समान अर्थाने वापरले जाते परंतु त्यामध्ये भिन्नता आहे. बचत आणि गुंतवणुक समान असण्याची कारण म्हणजे विशिष्ट कालावधीमध्ये पूर्ण रोजगाराची स्थिती असणे होय. परंतु जर पूर्ण रोजगाराची स्थिती जर देशामध्ये नसेल तर बचत आणि गुंतवणुकीमध्ये असमानता निर्माण होईल आणि ही असमानता व्याज दराच्या तंत्राद्वारे दूर करता येईल. सर्वसामान्यपणे व्यक्ती आपल्या कडील बचती विविध माध्यम क्षेत्रामध्ये गुंतवणूक करीत असताना जास्तीचा परतावा कसा मिळेल याचा विचार करून करीत असतात. केन्सच्या मते गुंतवणुक ही प्रभावी मागणी तसेच बचत व गुंतवणुकीच्या प्रमाणावर अवलंबून असते. एकूण प्रभावी मागणी उपभोग व भांडवली खर्चावर अवलंबून असते. गुंतविलेल्या भांडवलावर लाभाच्या सामान्य दर म्हणजे भांडवलाची सीमांत लाभ क्षमता होय. खाजगी गुंतवणुकी व्याजाच्या सामान्य दरावर सुद्धा अवलंबून असते. सनातनवादी अर्थतज्ज्ञांच्या मते बचत आणि गुंतवणुकीमध्ये नेहमी पूर्ण रोजगाराची स्थिती राहिल्यास  समानता असते. परंतु केन्सच्या मते बचत आणि गुंतवणुकीमध्ये असमानता असते.

**संदर्भ ग्रंथ**

१) झिंगन एम. एल., मौद्रिक अर्थशास्त्र, वृंदा पब्लिकेशन प्रा. ली. दिल्ली.

२) झामरे जी. एन., स्थूल अर्थशास्त्र, पिंपळापुरे अँड कं. पब्लिशर्स, नागपूर.

३) झामरे जी. एन., भारतीय अर्थव्यवस्था विकास व पर्यावरणात्मक अर्थशास्त्र,. पिंपळापुरे अँड कं. पब्लिशर्स, नागपूर.

४) जैन के. पी., अर्थशास्त्र के सिद्धांत, साहित्य भवन आग्रा.

५) देशपांडे ज्योत्स्ना, समाचार अर्थशास्त्र, पिंपळापुढे अँड कं. पब्लिशर्स नागपूर.

६) कुलकर्णी एस. एन., कुलकर्णी सौ. लीला, सूक्ष्म अर्थशास्त्र, विद्या प्रकाशन नागपूर.